DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते



**नियमित दिवाणी दावा क्र.११४/२०२३**
**(जुना नियमित दिवाणी दावा क्र. ६२/२०२३)**
**निशाणी क्र.२४ खालील आदेश**

प्रस्तुत अर्जाने प्रतिवादी क्र. ५ ने एकतर्फा आदेश रद्द करणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व वादीने दिलेले म्हणणे वाचले. प्रतिवादी क्र. ५ यांचा व्यक्तिशः व वादीतर्फे वकील अजित आंब्रे यांचा युक्तिवाद ऐकला.

०३. प्रतिवादी क्र. ५ चे कथनाप्रमाणे कार्यालयीन कामाच्या व्यस्थतेमुळे ते मागील तारखेस ते न्यायालयात हजर राहू शकले नाही. परिणामी दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित करण्यात आला. शासनातर्फे कैफियत दाखल न झाल्यास शासनाचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, बचावाची संधी द्यावी अशी विनंती केली.

०४. वादीने अर्जास हरकत घेवून योग्य तो आदेश व्हावा असाा युक्तिवाद केला.

०५. उभय पक्षातर्फे करण्यात आलेल्या युक्तिवादाचे विवेचन आले. प्रस्तुत दाव्याने वादीने प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी दावा मिळकती अतिक्रमण केल्याचे आरोप करुन अतिक्रमित क्षेत्राचा ताबा मागितला. प्रतिवादी क्र. ५ यांनी मागील तारखेस गैरहजेरीबाबत दिलेली कारणे संयुक्तीक दिसून येते. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. ५ जे की शासनाचे प्रतिनिधी आहे, त्यांना आपली बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. प्रतिवादी क्र.५ विरुध्द दिनांक ०१/०९/२०२३ रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होवून उभय पक्षातील

वादाला पुर्णविराम मिळेल. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ५ विरुध्द दिनांक ०१/०९/२०२३ रोजी पारित झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो व कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

PRAVIN MOHANRAO UNHALE
Digitally signed by PRAVIN MOHANRAO UNHALE
Date: 2023.10.07 11:28:41 +0530

महाड — **(पी. एम. उन्हाळे)**
दिनांक ०६/१०/२०२३ — दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड